# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon


## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जनसंवाद आणि पत्रकारिता विभागातर्फे दि. ३० व ३१ ऑगस्ट २०१८ रोजी `रेडिओ कार्यक्रम निर्मिती, वृत्तसंपादन आणि कौशल्य` या विषयावर विद्यापीठस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

दि.३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता या कार्यशाळेचे उद्‌घाटन व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.डॉ.नितीन बारी यांच्या हस्ते होणार असून दुसऱ्या दिवशी (दि. ३१ ऑगस्ट रोजी) दुपारी ४ वाजता कार्यशाळेचा समारोप व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य श्री.दिलीप रामू पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या कार्यशाळेत उद्‌घाटनानंतरच्या प्रथम सत्रात आकाशवाणीचे जिल्हा वार्ताहर श्री. राजेश यावलकर हे `रेडिओसाठी क्षेत्रीय बातमी संकलन, लेखन, निवेदन आणि जिल्हा वार्तापत्र लेखन व सादरीकरण` या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तर दुसऱ्या सत्रात दुपारी २.३० वाजता आकाशवाणी जळगाव केंद्राचे वरिष्ठ उद्‌घोषक श्री.श्रीकांत दाणी हे `रेडिओ कार्यक्रम निर्मिती लेखन आणि उद्‌घोषणा कौशल्य` या विषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार आहेत.

दि. ३१ ऑगस्ट रोजी तृतीय सत्रात सकाळी १०.३० वाजता भारतीय संरक्षण मंत्रालयाच्या मुंबई विभागाचे जनसंपर्क अधिकारी व आकाशवाणीचे माजी वृत्तनिवेदक श्री.नरेंद्रकुमार विसपुते हे `रेडिओ बातमी निर्मिती प्रक्रिया व निवेदन कौशल्य` या विषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार आहेत. तर चौथ्या सत्रात दुपारी २.३० वाजता ९४.३ माय एफ.एम. जळगावचे आर.जे.अभय हे `एफ.एम.रेडिओ केंद्राची रचना, व्यवस्थापन आणि कार्यक्रम निर्मिती व कौशल्य` या विषयावर आणि आर.जे.तेजस्विनी या `रेडिओ जॉकी- कार्यपध्दती व कौशल्य` या विषयावर प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहे.

प्रस्तुत कार्यशाळा ही निःशुल्क असून सर्वांसाठी खुली आहे. मात्र चहा, नाश्ता, भोजन व निवास व्यवस्था आदी करण्यात आलेली नाही. सदर कार्यशाळेत इच्छुकांनी सहभागी व्हावे असे आवाहन कार्यशाळेचे आयोजक डॉ. सुधीर भटकर, विभागप्रमुख डॉ.तुकाराम दौड, डॉ.विनोद निताळे यांनी केले आहे.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 28 ऑगस्ट, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी